प्रेसनोट दि.१७/०५/२०१९

## लष्कर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## ३५४ मधील आरोपी २४ तासात अटक केले बाबत

दि.१६/०५/२०१९ रोजी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, यांचे दिमतीत व्ही.एम.गुरव,पोलीस उप निरीक्षक, पी.जी.गज्जेवार, पोलीस उप निरीक्षक तपास पथकातील पोलीस स्टाफसह लष्कर पोलीस ठाणेगु.र.न. २२३/२०१९ भादविकलम ३५४, ३५४(अ) या गुन्हया मधील घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज प्राप्तकरुन सदर वर्णनाचा इसमा बाबत गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती काढुन तपास केला असता, सदर वर्णनाचा इसम हा मुंजाबा वस्ती, धानोरी, पुणे येथे असल्याची बातमी पोहवा ३१२५ शितोळे व पोहवा ५८२६ थिकोळे यांना त्यांच्या बातमीदारा मार्फत प्राप्त झाली. प्राप्त माहिती नुसार मुंजाबा वस्ती, धानोरी, पुणे येथे नमुद स्टाफसह गेलो असता प्राप्त फुटेजमधील संशियत इसम दिसुन आल्याने सदर इसमास स्टाफच्या मदतीने ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारले असता,त्याने त्याचे नाव पत्ता राम बद्रीलाल दाबोडीया वय-४३, धंदा- नोकरी, रा. वानवडी,पुणे असे सांगीतले. सदर इसमास ताब्यात घेऊन लष्कर पोलीस स्टेशन येथे आणनु दाखल गुन्हयाचे अनुशंगाने अधिक चौकशी केली असता, राम बद्रीलाल दाबोडीया याने सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त श्री बच्चन सिंग सो, परि.२ पुणे व मा.सहा.पोलीस आयुक्तश्री नांदेडकर, स्वारगेट विभाग, पुणे यांचे मार्गदर्शना खाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.चंद्रकांत भोसले सो, यांचे नेतृत्वाखाली व्ही.एम. गुरव,पोलीस उप निरीक्षक,गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पी.जी.गज्जेवार, पोलीस उप निरिक्षक व तपास पथकातील, पो.हवा. ३१२५ प्रदिप शितोळे, पोहवा ५८२६ थिकोळे, पो.शि.७३३० अमोल राऊत, पो.शि.९८१५ पवन भोसले, पो.शि.९८२९ धावडे, पो.शि.९८१८ सागर हुवाळे, पो.शि ७६६१ तांबोळी यांनी केलेली आहे.